**पोलीस अधीक्षक कार्यालय, पालघर.**
जिल्हा मुख्यालय, कोळगाव, पालघर
दुरध्वनी – ०२५२५ - २५११००
E-mail: - sp.palghar@mahapolice.gmail.com

**प्रेसनोट क्र. २० दिनांक १९/०४/२०२४**

# तलासरी पोलीस ठाणे यांचेकडून विनापरवाना गावठी कट्टा, जिवंत काडतुसे बाळगणाऱ्या आरोपीवर कारवाई

दिनांक १८/०४/२०२४ रोजी तलासरी पोलीस ठाणेचे नेमुणकीतील पोना/५५८ महेश लक्ष्मण बोरसा, यांना गुप्त बातमीदारांमार्फत माहीती मिळाली की, राजेश चंदु धाडगा, रा. काजळी, पारसपाडा, ता. तलासरी, जि. पालघर हा इसम पल्सर मोटार सायकल क्रमांक एम.एच/४८/बी.एक्स/ २६७५ वरुन गावठी कट्टा घेऊन संजान बाजुकडे जाणार असल्याची खात्रीशिर माहीती मिळाल्याने सदरची माहीती तलासरी पोलीस ठाणेचे प्रभारी अधिकारी श्री. विजय मुतडक यांना दिली असता प्रभारी अधिकारी, तलासरी यांनी लागलीच पोलीस उप निरीक्षक/बबन सुकर गावीत, सफौ/हिरामण खोटरे, सफौ/जयराम उमतोल, पोशि/निलेश गांगोडा यांना आमगाव चेक पोस्ट येथे नाकाबंदीकरीता नेमलेल्या ठिकाणी जावुन उपविभागीय पोलीस अधिकारी, डहाणु विभाग स्ट्रायकिंगचे पोलीस अंमलदार यांचे मदतीने नाकाबंदी करीत असतांना रात्रौ १९.३० वाजता पल्सर मोटार सायकल क्रमांक एम.एच/४८/बी.एक्स/ २६७५ ही आल्याने सदरचे वाहन थांबवुन मोटार सायकल स्वार यांची झडती घेता त्याचे कमरेस लोखंडी गावठी कट्टा (पिस्टल) व पॅन्टचे खिशात एक जिवंत काडतुस मिळुन आले. नमुद इसमास नाव गाव विचारले असता त्याने त्याचे नाव राजेश चंदु धाडगा, वय ५० वर्षे, रा. काजळी, पारसपाडा, ता. तलासरी, जि. पालघर असे सांगितले. सदर इसमाचे ताब्यात मिळून आलेल्या गावठी कट्टा व जिवंत काडतुसचे वर्णन खालील प्रमाणे.

१) २०,०००/- रुपये किमतीचा एक काळया रंगाचा लोखंडी गावठी कट्टा (पिस्टल) त्यास पकडण्याच्या ठिकाणी दोन्ही बाहेरील बाजुला लाकडी प्लेट दोन स्क्रुने फिट केलेली असुन सदरचे पिस्टलच बॅरल १५ इंच लांबीचे व मुठीजवळ स्ट्रिगर असलेला, बॅरेल पासुन मुठीपर्यतची लांबी सुमारे २६ इंच असलेला.
२) ३५०/- रुपये किमतीच्या k.f.8 एम.एम मार्क असलेले कट्टा (पिस्टल)चे जिवंत एक काडतुसे.
३) ५०,००००/- रुपये किमतीची लाल रंगाची पल्सर मोटार सायकल क्र.एम.एच/४८/बी.एक्स/ २६७५ चेसिस नं MD2A36FXXLCL15100 व इंजिन नंबर JLXCLL02272 असा असलेली जु.वा.कि.सु. एकूण ७०,३५०/- रुपये.

सदर इसम हा विनापरवाना अवैधरित्या गावठी कट्टा संजान बाजुकडे घेऊन जात असतांना मिळुन आल्याने त्यास ताब्यात घेऊन तलासरी पोलीस ठाणे गु.र.नं. ।। १२५/२०२४ भारतीय हत्यार अधिनियम कलम ३/२५ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुन्हयाचा पुढिल तपास सपोनि/हेमंत देवरे, नेमणुक तलासरी पोलीस ठाणे हे करीत आहेत.

सदरची कामगिरी श्री. बाळासाहेब पाटील, पोलीस अधीक्षक, पालघर, श्री.पंकज शिरसाट, अपर पोलीस अधीक्षक, पालघर, श्रीमती अंकीता कणसे, उप विभागीय पोलीस अधिकारी डहाणु विभाग, पोलीस निरीक्षक/विजय मुतडक यांच्या मार्गदर्शनाखाली तलासरी पोलीस ठाणेचे पोलीस अधिकारी व अंमलदार यांचे पथकाने पार पाडली आहे.